मंगळवार, दि. ४ नोव्हेबर २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ७३ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

### पालकमंत्री पंकजा मुंडे यांच्या जिल्हा वार्षिक योजना मंजुरीतील अनियमिततेवर तक्रार; जिल्हा नियोजन समितीसमोर थेट प्रस्ताव सादर करून नियमभंग केल्याचा आरोप; जिल्हाधिकारींकडे सविस्तर निवेदन

# तुकड्यांत रस्त्यांची कामे, दर्जा धोक्यात; पूरसंरक्षण निधीतही 'मनमानी'; 'ग्रामपंचायतींना विशेष अनुदान' योजनाही नियमबाह्य

**जालना । प्रतिनिधी -** जिल्हा वार्षिक योजना सन २०२५-२६ अंतर्गत विविध योजनांमधील कामे मंजूर करताना पालकमंत्री मा. ना. पंकजा मुंडे यांनी स्वतःच्या स्वाक्षरीने दहा-दहा लाख रुपयांच्या लहान कामांचे प्रस्ताव थेट जिल्हा नियोजन समितीकडे सादर केल्याने शासन निर्णय, मार्गदर्शक तत्त्वे आणि महाराष्ट्र जिल्हा नियोजन समिती अधिनियम १९९८ चे उल्लंघन झाल्याचा गंभीर आरोप अनिरुद्ध मारोतीराव शेळके यांनी आपल्या तक्रारीत केला आहे.

अर्जदार शेळके यांनी या संदर्भात जालना जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती यांना सविस्तर निवेदन देऊन संबंधित कामे तत्काळ रद्द करण्याची मागणी केली आहे.

शासन निर्णयाचा भंग - अधिकारी व विभाग प्रमुखांना वगळून थेट प्रस्ताव शेळके यांच्या मते, शासन निर्णय दिनांक ३ सप्टेंबर २०१६ (ग्रामीण विकास व जलसंपदा विभाग) नुसार, जिल्हा वार्षिक योजनेतील कोणतेही प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्यामार्फतच जिल्हा नियोजन समितीकडे सादर केले जावेत, असा स्पष्ट नियम आहे.

मात्र, पालकमंत्री मुंडे यांनी १८ सप्टेंबर २०२५ रोजीच्या पत्राद्वारे (ज्याची प्राप्ती ६ ऑक्टोबर रोजी झाली) १५ कोटी २५ लाख रुपयांची १०८ कामांची यादी स्वतःच्या स्वाक्षरीने थेट जिल्हा नियोजन समितीकडे पाठवली असल्याचे पत्रकात नमूद आहे.

याशिवाय आमदार, खासदार आदी लोकप्रतिनिधींनीही आपल्या मतदारसंघातील प्रस्ताव थेट समितीकडे सादर केले आहेत. ही प्रक्रिया शासन निर्णयाचे उल्लंघन असल्याचे शेळके यांनी स्पष्ट केले आहे.

**'दहा-दहा लाखांच्या तुकड्या-तुकड्यांत रस्त्यांची कामे' - दर्जा व सातत्य धोक्यात**

तक्रारीनुसार, ग्रामीण रस्ते विकास व मजबुतीकरण (३०५४) या योजनेत रस्त्यांची कामे दहा-दहा लाखांच्या मर्यादेत तुकडे करून प्रस्तावित करण्यात आली आहेत.

या पद्धतीमुळे निर्माण झालेल्या अडचणींबाबत शेळके यांनी काही गंभीर निरीक्षणे मांडली आहेत:

संपूर्ण रस्त्याचा विकास न होता वर्षानुवर्षे लहान भागांवरच काम होत आहे. गुणवत्ता नियंत्रण कठीण होते आणि कामे निकृष्ट दर्जाची राहतात. शासन निधीचा प्रभावी उपयोग होत नाही; पैसा तात्पुरता खर्च होतो. काही रस्त्यांवर दरवर्षी निधी मंजूर असूनही रस्त्यांची स्थिती अत्यंत दयनीय आहे. कंत्राटदार आणि काही अधिकाऱ्यांमध्ये साटेलोटे होऊन बोगस बिलांची उचल केल्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

उदाहरणार्थ, निरखेडा-बाजीउम्रद रस्ता या प्रकरणात अनेक वेळा निधी मंजूर होऊनही रस्ता आजही वाहतुकीस अयोग्य असल्याचे पत्रात नमूद आहे.

**पूरसंरक्षण निधीतही 'मनमानी'चा आरोप**

शेळके यांनी पुढे नमूद केले आहे की, पूरसंरक्षण कामांसाठी प्रस्ताव तयार करण्याआधी संबंधित विभागाकडून सर्व्हे होणे आवश्यक असते. मात्र, पालकमंत्रींनी १३ सप्टेंबर २०२५ रोजीच थेट कामांची यादी जिल्हाधिकारींकडे पाठवून ती मंजुरीसाठी लघुपाटबंधारे विभागाकडे पाठविण्यास भाग पाडले.

या कामांमध्ये: मौजे बठाण (खु) - दुधना नदीच्या काठावर संरक्षण भिंत सिना नदी परिसरात गायत्री देवी मंदिराजवळ संरक्षण भिंत या दोन्ही ठिकाणी प्रत्येकी ५० लाखांची कामे दहा-दहा लाखांच्या पाच तुकड्यांमध्ये विभागण्यात आली.

शेळके म्हणतात, ही पद्धत हेतुपुरस्सर आहे. कामे लहान ठेवल्याने ती मजूर सोसायटी किंवा स्थानिक कंत्राटदारांना मिळतात, ज्यामुळे दर्जा घटतो आणि मोठे प्रकल्प परिणामकारक राहत नाहीत.

याशिवाय, पूरसंरक्षणाचा निधी घनसावंगी व अंबड तालुक्यांवरच केंद्रित करून, जालना शहरातील भाग्यनगर-शिवशक्ती ग्रीन सिटी परिसरातील पूरग्रस्त भागांकडे दुर्लक्ष करण्यात आले असल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

**'ग्रामपंचायतींना विशेष अनुदान' योजनाही नियमबाह्य**

पत्रात पुढे नमूद आहे की, जनसुविधेसाठी विशेष अनुदान योजना अंतर्गत १६ कोटी ६१ लाख रुपयांची १६४ कामे पालकमंत्रींनी स्वतःच्या पत्रावरून जिल्हा नियोजन समितीकडे प्रस्तावित केली आहेत. ही प्रक्रिया शासन निर्णयाच्या विपरीत असून, कामे फक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या प्रस्तावावरच विचारात घेतली जाऊ शकतात, असे शेळके यांनी नमूद केले आहे.

**'निधीचा लोकहितार्थ व प्रभावी उपयोग व्हावा'**

शेळके यांनी आपल्या पत्रात मागणी केली आहे की, पालकमंत्रींनी परस्पर प्रस्तावित केलेली सर्व कामे तातडीने रद्द करावीत. सर्व योजना शासन निर्णयानुसार मुख्य कार्यकारी अधिकारीमार्फत पुन्हा सादर कराव्यात. रस्त्यांची कामे किमान एक किलोमीटर लांबीची व डांबरीकरण स्वरूपात घ्यावीत. निधीचा वापर दीर्घकालीन आणि लोकहिताच्या दृष्टीने परिणामकारक व्हावा. त्यांनी इशारा दिला आहे की, जर या प्रकरणाचा पुनर्विचार करून नियमबद्ध सुधारणा झाल्या नाहीत, तर ते सक्षम न्यायालयात दाद मागतील किंवा आंदोलनाचा मार्ग अवलंबतील.

तक्रारीसोबत खालील कागदपत्रे जोडण्यात आली आहेत यात शासन निर्णय दिनांक ०३ सप्टेंबर २०१६ ची प्रत, प्रस्तावित कामांची यादी, जिल्हा नियोजन समिती व विभागीय अधिकाऱ्यांची पत्रव्यवहाराची प्रत

ही तक्रार जिल्हा नियोजन प्रक्रियेतील पारदर्शकतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निमर्ाण करते. नियोजन समित्यांचे मूळ उद्दिष्ट लोकप्रतिनिधींच्या सल्ल्याने योजनाबद्ध विकास करणे असले, तरी प्रस्ताव प्रक्रिया प्रशासनिक यंत्रणेपासून वेगळी केल्यास शासन निर्णयाचा हेतूच धोक्यात येतो.

जालना जिल्ह्यातील या प्रकरणाचा प्रशासनिक स्तरावर उच्चस्तरीय चौकशी करून जबाबदारी निश्चित करणे आवश्यक ठरते.

युवा आदर्श वाचकांसाठी अनिरुद्ध शेळके यांनी दिलेली तक्रार जशाास तशी देत आहोत....

**प्रति,**

**मा. जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, जालना.**

विषय :- जिल्हा वार्षिक योजना सन २०२५ २६ अंतर्गत कामे मंजुरीसाठी पालकमंत्री मा.ना. पंकजा मुंडे यांनी स्वतःच्या स्वाक्षरी मध्ये जिल्हा नियोजन समिती मध्ये दहा दहा लक्ष मर्यादित कामे प्रस्तावित केल्याने झालेल्या अनियमितेबाबत.

अर्जदारः अनिरुध्द मारोतीराव शेळके मो.नं. ******९५८४

महोदय,

वरील विषयी विनंती, की, जिल्हा वार्षिक योजना सन २०२५ २६, विविध योजने अंतर्गत पालकमंत्री मा.ना. पंकजाताई मुंडे यांनी स्वतःच्या स्वाक्षरी मध्ये जिल्हा नियोजन समिती मध्ये दहा दहा लक्ष मर्यादित तुकडे - तुकडे करुन कामे मंजुरीसाठी प्रस्तावित केल्याने अनियमितता झालेली आहे, शासन निर्णय दि.०३ सप्टेंबर २०१६, महाराष्ट्र जिल्हा नियोजन समिती अधिनियम १९९८ व नियोजन विभागाचे वार्षिक मार्गदर्शक परिपत्रकाचे उल्लंघन झालेले आहे. याचे सविस्तर विश्लेषण खालीलप्रमाणे आहे.

ग्रामीण रस्ते विकास व मजबुतीकरण (३०५४) योजना :-

जिल्हा वार्षिक **पान ३ वर**

युवा आदर्श

## महाभारत...

महाभारत युध्दात
भांबावला तो पार्थ
जाणता महा गिता
झाला सार्थ कृतार्थ
कर्मण्येव अधिकार
आचरणी मतितार्थ
हित पाही सैन्याचे
योजने दूर तो स्वार्थ
अटीतटीची लढाई
युध्द केले ते धर्मार्थ
हारजीत पल्याडचा
समजला अन्वयार्थ
आपसूक मिळे सत्य
निस्पृह करे परमार्थ
कर्म योग निष्कामते
वाट चांगली यतार्थ
समंजस दोन्ही बाजू
टाळे युध्दाचा अनर्थ
तड जोडी साधणारा
असो मध्यस्थ समर्थ
धर्माच्या बाजू लढता
कळे जीवन अदृष्टार्थ
ज्ञानेश्वरामुळेजाणला
महाभारत उत्तानार्थ

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.


### मनपाची सर्वसाधारण सभा आयुक्त तथा प्रशासक आशिमा मित्तल यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न

# कार्यपद्धतीत पारदर्शकता, कार्यक्षमता आणि जबाबदारी वाढविण्यासाठी महत्त्वपूर्ण सुचना

**जालना । प्रतिनिधी -** जिल्हाधिकारी तसेच जालना शहर महानगरपालिकेच्या आयुक्त व प्रशासक श्रीमती आशिमा मित्तल यांच्या अध्यक्षतेखाली सोमवार (दि. ३ नोव्हेंबर २०२५) रोजी त्यांच्या कार्यकाळातील प्रथम सर्वसाधारण सभा उत्साहात पार पडली. सभेत महापालिकेच्या प्रशासकीय, आर्थिक आणि विकासात्मक विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली. बैठकीदरम्यान आयुक्त मित्तल यांनी महानगरपालिकेच्या कार्यपद्धतीत पारदर्शकता, कार्यक्षमता आणि जबाबदारी वाढविण्यासाठी महत्त्वपूर्ण सूचना केल्या.

**आयुक्त तथा प्रशासक आशिमा मित्तल यांच्या महत्त्वपूर्ण सूचना**

जिल्हा वार्षिक योजना निधी अंतर्गत प्रस्तावित सर्व कामांचे आराखडे तयार करून मंजुरीसाठी सादर करावेत. आगामी महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ लक्षात घेऊन निवडणूक खर्चाचा आराखडा तयार करून आवश्यक निधी राखीव ठेवावा. जालना-जायकवाडी पाणीपुरवठा योजनेच्या देखभाल व दुरुस्तीचे बील अदा करण्यापूर्वी प्रत्यक्ष कामाची खात्री करूनच मंजुरी द्यावी. महानगरपालिकेने विविध योजनेत भरावयाचा शेअर / वाटा तसेच थकीत कंत्राटदार बिले यांची अद्ययावत यादी तयार ठेवावी. पाणीपुरवठा विभागातील देखभाल व दुरुस्तीची कामे वार्षिक पाणीपट्टी वसुलीतील निधीतून करावीत. जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत प्रस्तावित तसेच अत्यावश्यक कामांच्या दरपत्रकांना **पान २ वर**



# विठ्ठल -रुक्मिणी मंदिर परिसराचा कायापालट करणार - आ.खोतकर

**जालना । प्रतिनिधी -** नळ गल्ली परिसरातील श्री विठ्ठल - रुक्मिणी मंदिरात पायाभूत सुविधांसाठी सर्वांगीण विकासासाठी आपण ५० लाखांचा निधी दिला असून विकास कामांमुळे परिसराचा कायापालट होईल, असा विश्वास आ.अर्जुनराव खोतकर यांनी व्यक्त केला.

कार्तिकी भागवत एकादशी निमित्त रविवारी ( ता.०२) विठ्ठल -रुक्मिणी मंदिरात चांदीचा मुकुट अर्पण व अभिषेक सोहळा आ. अर्जुनराव खोतकर यांच्या हस्ते संपन्न झाला.यावेळी शिवसेना शहर प्रमुख विष्णू पाचफुले, गणेश राऊत, इंदरचंद तवरावाला, समाजसेवक मेघराज चौधरी, विशाल दीपवाल, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक रितेश कामड, डॉ. जनार्धन शहाणे, माजी नगरसेवक राजू सरोदे, राजू भगत, नितीन जांगडे, सचिन भुरेवाल, प्रदीप चौधरी, रमेश रामदासी, योगेश वडगांवकर, दिनेश जेठे, राहुल जैस्वाल यांच्या प्रमुख उपस्थिती होती.

या प्रसंगी आ. अर्जुनराव खोतकर यांच्या हस्ते विकास कामांचे भूमीपूजन करण्यात आले. मंदिराच्या विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही अशी ग्वाही आ.खोतकर यांनी यावेळी दिली. संस्थानच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

एकादशी निमित्त भाविकांना साबुदाणा खिचडी चे वाटप करण्यात आले. यावेळी महिला व भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



### मनपामार्फत एकल प्लास्टिक वापरावर कारवाई

# नियमितपणे कारवाई करण्यावर भर

### अतिरिक्त आयुक्त अर्जुन गिराम यांचा इशारा

**जालना । प्रतिनिधी -** एकल वापराच्या प्लास्टिकवरील (Single Use Plastic) शासनबंदीचा कठोर अंमल करण्यासाठी जालना शहर महानगरपालिका प्रशासनाने आज (दि. ३ नोव्हेंबर २०२५) शहरात मोठ्या प्रमाणावर कारवाई राबवली. नवीन जालना आणि जुना जालना विभागातील सर्व स्वच्छता निरीक्षकांमार्फत ही कारवाई करण्यात आली.

**शहरातील प्लास्टिक साठ्यावर धडक कारवाई**

महानगरपालिकेला प्राप्त माहितीनुसार शहरातील काही दुकानदार व आस्थापनांकडे प्लास्टिकचा साठा असल्याची माहिती मिळाल्याने फुले मार्केट, नवीन जालना येथील सुमीत एजन्सी या आस्थापनावर छापा टाकण्यात आला. तपासणीत तेथे एकूण २ कुंटल ९४ किलो प्लास्टिक साठा आढळून आला. संबंधित आस्थापनावर रु ५,००० (पाच हजार रुपये) दंड आकारण्यात आला व संपूर्ण प्लास्टिक जप्त करण्यात आले.

तसेच जुना जालना विभागात इतर व्यापाऱ्यांवर केलेल्या कारवाईत आणखी रु ६,००० दंड वसूल करण्यात आला. अशा प्रकारे आजच्या मोहिमेत एकूण रु ११,००० दंड व २ कुंटल ९४ किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले.

ही कारवाई जिल्हाधिकारी तथा आयुक्त आणि प्रशासक जालना शहर महानगरपालिका श्रीमती आशिमा मित्तल यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. यावेळी अतिरिक्त आयुक्त अर्जुन गिराम, सहायक आयुक्त, सर्व स्वच्छता निरीक्षक, तसेच संबंधित विभागातील मनपा कर्मचारी उपस्थित होते.

अतिरिक्त आयुक्त अर्जुन गिराम यांनी सांगितले की, एकल वापराच्या प्लास्टिकवर बंदी ही केवळ औपचारिक नाही; शहरात नियमित पाहणी आणि दंडात्मक कारवाई सुरूच राहील. पर्यावरण संरक्षणासाठी **पान २ वर**

## संपादकीय

# महिला क्रिकेट संघाची ऐतिहासिक कामगिरी !

२ नोव्हेंबर २०२५ हा दिवस भारतीय महिला क्रिकेट इतिहासात सुवर्णाक्षराने नोंदवला जाणार आहे कारण यादिवशी भारतीय महिला संघाने दक्षिण आफ्रिकेवर ५२ धावांनी विजय मिळवत विश्व विजयाला गवसणी घालत ऐतिहासिक कामगिरी केली. या क्षणाची प्रतीक्षा १४५ कोटी भारतीय गेली अनेक दशके करत होता. रविवारी नवीमुंबईच्या डी वाय पाटील स्टेडियमवर दक्षिण आफ्रिकेविरुद्ध झालेल्या अंतिम सामन्यात भारतीय महिला संघाने विजय मिळवून देशवासीयांना दिवाळीची अनोखी भेट देतील याची चाहूल शुक्रवारी झालेल्या उपांत्य फेरीतील सामन्यातच लागली होती. ऑस्ट्रेलिया विरुद्ध झालेल्या उपांत्य फेरीच्या सामन्यात जेमिना रॉड्रिग्स हिने अविश्वसनीय खेळ करून भारताला अंतिम फेरीत पोहचवले. अंतिम फेरीत भारताचा मुकाबला दक्षिण आफ्रिकेशी होता. भारतीय संघाने जर आपल्या क्षमतेनुसार खेळ केला तर भारतीय संघ विश्वषकावर नाव कोरेल असा विश्वास देशवासीयांना होताच मात्र दक्षिण आफ्रिकेला कमी लेखण्याची चूक भारतीय संघ करणार नव्हता कारण साखळीत या संघाने भारताला नमवले होते. दक्षिण आफ्रिकेने नाणेफेक जिंकत भारताला प्रथम फलंदाजी दिली. शेफाली वर्मा आणि स्मृती मानधना यांनी शतकी सलामी देऊन भारताला चांगली सुरुवात करून दिली. भारताची सलामीवीर शेफाली वर्माने धडाकेबाज फलंदाजी करत अवघ्या ७८ चेंडूत ८७ धावा केल्या विशेष म्हणजे ती भारताच्या मुख्य संघात नव्हती मात्र प्रतिका रावल ही दुखापतग्रस्त झाल्याने तिची भारतीय संघात निवड झाली आणि तिने मिळालेल्या संधीचे सोने केले. धडाकेबाज फलंदाजीसोबतच तिने दोन बळी घेऊन अष्टपैलू कामगिरी केली आणि सामनावीर किताब मिळवला. दीप्ती शर्मा या आणखी एका अष्टपैलू खेळाडूने अर्धशतक झळकावले आणि गोलंदाजीत ५ बळी मिळवले. स्पर्धेत २०० च्या वर धावा आणि सर्वाधिक २२ बळी या तिच्या अष्टपैलू कामगिरीची दखल घेऊन तिला मालिकावीर पुरस्काराने गौरविण्यात आले. शेफाली आणि दीप्तीला स्मृती मानधना, हरमनप्रित कौर, जेमिना रॉड्रिग्ज, रिचा घोष यांची चांगली साथ दिल्याने भारताने २९८ धावा काढल्या. अंतिम सामन्यात या धावा पुरेशा ठरल्या. भारताच्या सर्वच गोलंदाजांनी चांगली गोलंदाजी केल्याने भारताने दक्षिण आफ्रिकेला ५२ धावांनी सहज नमवता आले. दक्षिण आफ्रिकेची कर्णधार लॉरा हिने झुंझार शतक झळकावत संघाला विजय मिळवून देण्याचा प्रयत्न केला पण तिचे प्रयत्न अपुरे ठरले आणि भारताने ऐतिहासिक विजय मिळवत पहिल्यांदाच विश्वचषकावर नाव कोरले. भारतीय महिलांची ही कामगिरी महिला क्रिकेट संघासाठी संजीवनी देणारी ठरणार आहे कारण आपल्या देशात महिला क्रिकेटला कधीच गांभीर्याने घेतले जात नाही. याला मीडियाही अपवाद नाही. मीडिया पुरुष क्रिकेटला जितकी प्रसिद्धी देतात त्याच्या दहा टक्केही प्रसिद्धी ते महिलांच्या क्रिकेटला देत नाही. महिला क्रिकेट संघाच्या सामान्यांना टीव्हीवर थेटपणे दाखवले जात नाही. हा विश्वचषक असल्याने याचे थेट प्रेक्षपण केले गेले मात्र द्विपक्षीय मालिका टीव्हीवर दाखवल्या जात नाहीत. महिला क्रिकेट संघाला प्रायोजकही मिळत नाही असे असतानाही महिला क्रिकेटपटू मात्र आपले काम इमाने इतबारे करून देशाचा गौरव वाढवण्याचा प्रयत्न करतात हेच या विश्व विजयाने दाखवून दिले आहे. याआधी भारताच्या १९ वर्षाखालील मुलींनी दोनदा विश्वचषक जिंकला आहे मात्र वरिष्ट संघाला विश्वविजयाला गवसणी घालण्यात अपयश येत होते. दोनदा भारतीय संघ विश्वचषकाच्या अंतिम फेरीत पोहचला होता मात्र त्या संघांना विश्व विजयाला गवसणी घालण्यात अपयश आले होते त्यामुळे भारताच्या वरिष्ट संघाला विजेतेपद मिळवणे शक्य नाही अशी टीका होत होती. साखळी फेरीतही भारतीय महिला संघाने सलग तीन सामने गमावल्या नंतर या संघावर टीका होऊ लागली मात्र भारताच्या महिला खेळाडूंनी या टीकेकडे दुर्लक्ष केले आणि आपल्या खेळावर लक्ष केंद्रित करून अशक्य वाटणारी कामगिरी शक्य करून सर्वांनाच चकित केले. भारतीय महिला संघाने फलंदाजी, गोलंदाजी, क्षेत्ररक्षण या तिन्ही आघाडीवर अप्रतिम कामगिरी केली. कर्णधार हरमनप्रीत कौर यांनी या संघाचे नेतृत्व कुशलतेने केले. या संघाचे प्रशिक्षक अमोल मुजुमदार यांनी संघाला विश्व विजयी करण्यात मोलाची कामगिरी बजावली. एकूणच सांघिक कामगिरी करून भारताने हा विश्वविजय मिळवला आहे. भारताच्या महिला संघाची ही कामगिरी ऐतिहासिकच आहे. भारताच्या या महिला खेळाडूंच्या कामगिरीचा देशातील १४५ कोटी जनतेला सार्थ अभिमान आहे. महिला क्रिकेटसाठी हा क्षण सुवर्ण अक्षरांनी लिहिण्यासारखा आहे. महिला क्रिकेटला उर्जितावस्था देणारा हा विजय आहे. पुरुष क्रिकेटमध्ये जे कपिल देवच्या संघाने १९८३ साली केले होते तेच हरमनप्रित कौरच्या या संघाने करून दाखवले आहे. पहिल्यांदाच विश्वचषक जिंकून भारताच्या या महिलांनी इतिहास घडवला आहे. भारताच्या या महिला खेळाडूंनी भारताचा तिरंगा अभिमानाने फडकवला आहे. वास्तविक भारताच्या महिला संघाने यापूर्वी देखील देशासाठी अनेकदा अप्रतिम कामगिरी केली आहे असे असूनही भारतीय महिला क्रिकेटला देशात गांभीर्याने घेतले जात नाही. जितकी लोकप्रियता पुरुषांच्या क्रिकेटला मिळते तितकी महिला क्रिकेटला मिळत नाही ही दुर्दैवाची बाब आहे. या विश्व विजेतेपदानंतर तरी देशात महिला क्रिकेटला गांभीर्याने घेतले जाईल अशी आशा करूया. पहिल्यांदाच विश्वचषकावर भारताचे नाव कोरून इतिहास घडवणाऱ्या भारतीय महिला क्रिकेट संघाचे मनापासून अभिनंदन! चक दे इंडिया!! जय हो!!!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# राष्ट्रीयकृत बँकांमध्ये मराठी भाषिक अधिकारी अनिवार्य करण्याची मागणी

## भाषेच्या अडथळ्यामुळे ग्रामीण शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणींबाबत मराठा महासंघाचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

**जालना । प्रतिनिधी** - महाराष्ट्रातील बहुतांश राष्ट्रीयकृत बँकांमध्ये मराठी भाषिक नसलेले अधिकारी कार्यरत असल्याने त्यांना फक्त इंग्रजी आणि थोडकी मोडकी हिंदी भाषा बोलता येते. परिणामी ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना व्यवहार करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या गंभीर प्रश्नावर शासनाचे लक्ष वेधण्यासाठी अखिल भारतीय मराठा महासंघाच्यावतीने सोमवार दि. ३ नोव्हेंबर रोजी जिल्हाधिकारी श्रीमती अशीमा मित्तल यांच्यामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन पाठवण्यात येऊन राष्ट्रीयकृत बँकांमध्ये महाराष्ट्राची बोलीभाषा मराठी अवगत असलेल्या महाराष्ट्रीयन अधिकाऱ्यांनाच नियुक्ती देण्यात याव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.

मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख, जिल्हा कोषाध्यक्ष अशोक पडूळ यांच्यासह जिल्हा वकील संघाचे माजी अध्यक्ष ड. डॉ. आनंद झा, ड. आशिष इंगळे, सामाजिक कार्यकर्ते गणेश तरासे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, राज्यातील अनेक राष्ट्रीयकृत बँकांमध्ये कार्यरत अधिकारी मराठी न बोलणारे असल्याने ग्रामीण शेतकऱ्यांशी संवाद साधताना मोठा अडथळा निर्माण होतो. या भाषेच्या दुराव्यामुळे गैरसमज, तणाव आणि वाद निर्माण होतात. राज्य शासनाने मराठी भाषेला प्रशासकीय प्राधान्य दिले असले तरी राष्ट्रीयकृत बँकांत त्याची अंमलबजावणी होत नाही, ही खेदजनक बाब आहे. आमचा हा मुद्दा परप्रांतीयांविरोधात नसून, शेतकऱ्यांच्या हिताशी संबंधित आहे. शहरी आणि ग्रामीण भागातील राष्ट्रीयकृत बँकांमध्ये कार्यरत अधिकाऱ्यांना स्थानिक भाषेचे ज्ञान असणे ही काळाची गरज आहे. मराठी भाषिक अधिकाऱ्यांचा फक्त इंग्रजी आणि हिंदी भाषेवरच जोर असतो. आणि या दोन्ही भाषा शेतकऱ्यांना बोलताही येत नाहीत आणि समजतही नाहीत. मग त्यांनी आपल्या समस्या आणि प्रश्नांसंदर्भात व्यक्त व्हायचे कसे?,



अधिकाऱ्यांना मराठी भाषा समजत नसल्याने ते मराठीत बोलणाऱ्या शेतकऱ्यांच्या तोंडाकडे पाहत राहतात. कधी कधी अपमानास्पद वागणूकही देतात. ही बाब विचारात घेता, महाराष्ट्रातील सर्व राष्ट्रीयकृत बँकांमध्ये मराठी भाषिक अधिकारी नियुक्त करावेत अथवा इतर राज्यांतील अधिकाऱ्यांना महाराष्ट्रात नियुक्त करण्यापूर्वी मराठी भाषेचे प्रशिक्षण देणे अनिवार्य करून प्रत्येक बँक शाखेत मराठी संवादक समन्वयक नेमावा, जो शेतकऱ्यांशी स्थानिक भाषेत संवाद साधू शकेल. शासनाने या विषयाकडे गांभीर्याने लक्ष देऊन लवकरात लवकर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा अखिल भारतीय मराठा महासंघाने व्यक्त केली आहे.

# एवढे अनर्थ एका कायद्याने केले

शेतकरी पुन्हा पुन्हा कर्जबाजारी का होतो? या प्रश्नाचे उत्तरही तेच आहे जे शेतकरी आत्महत्या का करतो, या प्रश्नाचे आहे. शेतकऱ्यांच्या दररोज आत्महत्या होतात, त्याची तुम्ही दखल घेतली नाही. असो, कर्जमाफीच्या निमित्ताने का होईना त्याचा विचार करायचे म्हणतात. हेही नसे थोडके. शेतकरी पुन्हा पुन्हा कर्जबाजारी होतो, याला शेतकरी कारणीभूत नसून खुद्द सरकार कारणीभूत आहे हे सर्वप्रथम लक्षात घेतले पाहिजे. कमाल शेतजमीन धारणा कायद्यामुळे जमिनीचे विखंडन झाये आहे. आज सरासरी धारणा (होल्डिंग) २ एकर पेक्षा कमी झाली आहे. हे क्षेत्र आजच्या शेती पद्धतीत 'अन-इकॉनॉमिक मानले जाते. हा सीलिंगचा कायदा कालबाह्य झाला आहे. तो आणला होता सरकारने, राबवविला सरकारने, रद्द कोण करणार? सरकारलाच रद्द करावा लागेल. हा कायदा रद्द करणे राज्य सरकारच्या अधिकारात आहे. केवळ सीलिंग कायदाच नव्हे, त्याच्या जोडीला आवश्यक वस्तू कायदा ही तेवढाच राक्षसी आहे.

**आवश्यक वस्तू कायदा**

आवश्यक वस्तू कायदा- १९५५ हा कायदा जनतेला 'आवश्यक वस्तू' वाजवी दरात मिळाव्यात म्हणून आणला, असे सरकार तर्फे सांगण्यात आले होते, पण प्रत्यक्षात त्याचा लाभ गोरगरिबांना कधीच मिळाला नाही. उलट या कायद्याचा लाभ उठवून पुढारी व अधिकारी मात्र गब्बर झाले. आवश्यक वस्तू कायद्याचा वापर करून शेतमालाच्या किंमती पाडण्यात आल्या, या कायद्याच्या धास्तीने साठवणुकीच्या व्यवस्था निर्माण होऊ शकल्या नाहीत. या कायद्याचा आधार घेऊन नोकरशाहीने भरपूर भ्रष्टाचार केला, कृत्रिम टंचाईमुळे महागाई वाढली, बाजाराचे 'मागणी आणि पुरवठ्याचे' तत्व पायदळी तुडवले केले, बचत न राहिल्यामुळे शेतकरी देशोधडीला लागले, म्हणून शेतकरी वारंवार कर्जबाजारी होतो. एवढे अनर्थ एका कायद्याने केले. आवश्यक वस्तू कायद्याने अनेक अनर्थ केले आहेत. त्यांचा आढावा पुढे घेण्यात आला आहे.

**शेतमालाच्या किंमतींवर नियंत्रण**

सरकार या कायद्याखाली धान्य, डाळी, तेलबिया, साखर इत्यादी वस्तूंवर साठवणूक, वाहतूक, दर नियंत्रण यासाठी सक्ती करू शकते. त्यामुळे व्यापारी आणि प्रक्रिया उद्योग शेतकऱ्यांकडून योग्य दराने खरेदी करत नाहीत. परिणामतः शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाचा योग्य बाजारभाव मिळत नाही आणि तोटा होतो. वारंवार तोटा होत राहिल्यामुळे शेतकरी देशोधडीला लागले.

**गुंतवणुक आणि साठवणुकीवर प्रतिकूल परिणाम**


उद्योगपतींना भीती वाटते की, सरकार केव्हाही साठा जप्त करू शकते. त्यामुळे कोल्ड स्टोरेज, वेअरहाउसिंग आणि अन्नप्रक्रिया उद्योगात गुंतवणूक करीत नाहीत. परिणामतः कृषी विपणन साखळी नीटपणे बनू शकली नाही आणि शेतमालाची नासाडी वाढली. शेती व्यावसाय अडचणीत आला.

**बाजारात अनिश्चितता आणि भ्रष्टाचार**

आवश्यक वस्तू कायद्यामुळे सरकारी अधिकारी वर्गाला साठेबाजी विरोधी व अन्य बाबतीत कारवाईचे अमर्याद अधिकार मिळाले आहेत, हे अधिकार मनमानी, भ्रष्टाचार आणि दडपशाहीसाठी वापरले गेले. परिणामतः प्रामाणिक व्यापारी व शेतकरी दोघेही त्रस्त झाले.

**कृत्रिम तुटवडा आणि महागाई**

जेव्हा सरकार बंधन घालते तेव्हा व्यापारी आपला माल बाजारात आणत नाहीत. पुरवठा कमी होतो, आणि कृत्रिम टंचाईतून कृत्रिम महागाई निर्माण होते. त्यामुळे जनतेला वस्तू महाग मिळतात - ज्या वस्तू 'स्वस्त मिळाव्यात' म्हणून कायदा बनवला गेला, असे सरकार म्हणत होते, त्याच कायद्यामुळे महागाई वाढू लागली. ही विपरीत परिस्थिती अनेकदा दिसून आली तरी कोणतेच सरकार त्याबाबत पुनर्विचार करीत नाही..




**कृषी बाजार व्यवस्थेतील हस्तक्षेप व विकृती**

बाजारात मागणी-पुरवठ्याच्या नैसर्गिक संतुलनावर सरकारी हस्तक्षेपामुळे दुष्परिणाम होतो. त्यामुळे शेतकरी उत्पादनाच्या योजना आखू शकत नाहीत - कोणते पीक पेरावे, किती उत्पादन घ्यावे, याबाबत अनिश्चितता वाढते. हा कायदा लोकहितासाठी आहे, असा सरकारचा दावा असला तरी दीर्घकाळात त्याने शेतकऱ्यांच्या व्यवसाय स्वातंत्र्यावर, कृषी बाजारावर आणि गुंतवणुकीवर विपरीत परिणाम केला आहे, असे दिसून येते.

**देशाचे नुकसान करणारा कायदा**

आवश्यक वस्तू कायद्याने देशाला दुबळे बनवले आहे. या कायद्यामुळे देशाची अर्थव्यवस्था खिळखिळी झाली.

**कायम दुरुपयोग**

या कायद्याने सरकारला मिळालेल्या अधिकाराचा सातत्याने दुरुपयोग केला. ज्या कायद्याचा कायम दुरुपयोगच झाला असेल तर असा कायदा का कायम ठेवायचा? या दुरुपयोगाने देश क्षीण झाला आहे.

**एक चाक रुतले**

या कायद्याचा सर्वात जास्त फटका शेतकाऱ्यांना बसला. वाजवी भाव मिळाला नाही म्हणून शेतकऱ्याकडे 'बचत' राहिली नाही. बचत न राहिल्यामुळे तो 'ग्राहक' बनू शकला नाही. शेतकाऱ्यांची क्रयशक्ती क्षीण राहिल्यामुळे, देशी बाजार पेठेत मागणी कमी राहिली. मोठा ग्राहक वर्ग क्रयशक्ती अभावी बाजारापासून दूर राहिला. त्याचा भारतीय उत्पादकतेवर विपरीत परिणाम झाला. भारतीय अर्थ व्यवस्थेचे एक चाक कायम रुतलेले राहिले म्हणून विकासाचा वेग मंदावला.

**मूल्यवृद्धीपासून वंचित**

आवश्यक वस्तू कायद्यातील बंधनांमुळे ग्रामीण भागात प्रक्रिया उद्योग निर्माण झाले नाहीत. त्यामुळे शेतीमालाची नासाडी होत राहिली. शेतमालावर प्रक्रिया केल्याने होणाऱ्या मूल्यवृद्धीचा लाभ शेतकऱ्यांना मिळू शकला नाही.

**किसानपुत्रांची बेरोजगारी**

आवश्यक वस्तू कायद्याने ग्रामीण भागात प्रक्रिया उद्योग सुरू करण्यात मोठा अडथळा निर्माण केला. त्यामुळे किसानपुत्रांना रोजगार मिळू शकले नाही. ग्रामीण भागातील लोकांना सक्तीचे स्थलांतर करावे लागले. या स्थलांतराने शहरीकरणाचा नवा गंभीर प्रश्न निर्माण झाला. स्थलांतरित किसानपुत्रांमुळे शहरी व्यवस्थांवर नवे ताण आले.

**भ्रष्टाचाराचे गटार**

हा कायदा भ्रष्टाचाराचे गटार मानला जातो. या कायद्याने सरकारी अधिकाऱ्यांना दिलेले अवाजवी अधिकार व लायसन्स, परमिट, कोटा या पद्धतीच्या वापरामुळे आपल्या देशात फार मोठ्या प्रमाणात प्रशासकीय भ्रष्टाचार माजला. लोकपाल नेमल्याने भ्रष्टाचार कमी होणार नाही पण आवश्यक वस्तू कायदा रद्द केला तर या देशातील ८० टक्के भ्रष्टाचार नक्की संपेल. ही गटारगंगा दिल्ली पासून गल्ली पर्यंत वाहात आली आहे.

**सरकार पोषित कारखानदारी**

आवश्यक वस्तू कायद्यातील लायसन्स, परमिट, कोटा या पद्धतीने सरकार पोषित कारखानदारी निर्माण केली. या पद्धतीने राजकर्त्यांनी आपल्या बगलबच्च्यांना पोसले. बगलबच्या कारखानदारांनी देश काबीज केला आहे. कालपर्यंत वाटत होते की राज्यकर्ते कारखानदारांना संरक्षण देतात, आज कारखानदार जणू देश चालवत आहेत असे चित्र निर्माण झाले आहे.

**राजकारणी उच्छाद**

आवश्यक वस्तू कायद्याचे लाभार्थी असलेल्या लोकांनी आज राजकारणात उच्छाद मांडला आहे. सरकारी लायसन्स कोटा परमीत यांचा लाभ न घेतलेला राजकारणी क्वचित दिसेल. या उच्छादाला आपल्या देशातील निवडणूक पद्धतीने हातभार लावला आहे.

एकंदरीत, शेतकरी पुन्हा पुन्हा कर्जबाजारी होण्याचे मूळ कारण सीलिंग, आवश्यक वस्तू या शेतकरीविरोधी कायद्यात आहे. आवश्यक वस्तू कायद्याने एका बाजूला अर्थव्यवस्था उद्धवस्त केली, शेतकाऱ्यांना उध्वस्त केले व त्याच बरोबर देशाचे मोठे नुकसानही केले. एवढे अनर्थ एका कायद्याने केले! असे कायदे कायम ठेवून तुम्ही कर्ज-बेबाकी केली तर शेतकरी पुन्हा पुन्हा कर्जबाजारी होणारच.

**अमर हबीब, आंबाजोगाई**
**किसानपुत्र आंदोलन**
**मो. ८४११९०९९०९**

पान १ वरुन

## कार्यपद्धतीत पारदर्शकता ...

तत्काळ मान्यता द्यावी. शासनाकडून प्रलंबित असलेल्या विविध योजनेसाठी निधी मागणीपत्रे पाठवावीत. प्रस्तावित आरोग्य केंद्रासाठी फर्निचर जिल्हाधिकारी कार्यालय, तहसील कार्यालय तसेच सामाजिक संस्थांच्या सहकार्याने तात्पुरते उपलब्ध करून घ्यावे. अनाधिकृत नळधारकांनी नळपट्टी जमा न केल्यास, त्यांचे नळजोड तत्काळ तोडण्याची कार्यवाही करावी. महानगरपालिकेच्या निधीतून तातडीचे नसलेली कामे तात्पुरती थांबवावीत आणि त्यांवरील कार्यारंभ आदेश देऊ नयेत. विकासकामांसाठी निधी अपुरा असल्याने, महापालिका निधीतून नितांत आवश्यक नसलेल्या कामांना प्रशासकीय मान्यता देऊ नये. नागरिकांच्या मूलभूत सोयीसुविधांसाठीचे प्रस्ताव जिल्हा नियोजन समिती व शासन निधीतून प्राधान्याने पूर्ण करावेत. महानगरपालिकेचा महसूल वाढविणे आणि अनावश्यक खर्चांवर नियंत्रण ठेवणे यावर भर द्यावा.

या सर्वसाधारण सभेस अतिरिक्त आयुक्त अर्जुन गिराम, उपायुक्त नंदा गायकवाड, सर्व सहाय्यक आयुक्त, शहर अभियंता, सभा अधीक्षक तसेच सर्व विभागप्रमुख उपस्थित होते.

सभेमध्ये शहरातील सुरू असलेल्या आणि आगामी विकास प्रकल्पांचा आढावा घेऊन त्यांची कार्यक्षमता वाढविणे, निधीचे योग्य नियोजन करणे व नागरिक-केंद्रित निर्णय घेणे या बाबींवर विशेष भर देण्यात आला. या सर्वसाधारण सभेमुळे जालना शहर महानगरपालिकेच्या कामकाजाला अधिक पारदर्शकता, जबाबदारी आणि आर्थिक शिस्त प्राप्त होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. आयुक्त आशिमा मित्तल यांनी स्पष्ट केले की, महानगरपालिकेचे प्रत्येक निर्णय हे नागरिकांच्या हिताच्या दृष्टीने घेतले जातील. निधीचा योग्य व पारदर्शक वापर, कार्यक्षमता आणि नियोजनबद्ध विकास हाच आमचा उद्देश असेल.

## नियमितपणे कारवाई ...

सर्व नागरिक आणि व्यापाऱ्यांनी मनपाला सहकार्य करणे गरजेचे आहे.

महानगरपालिकेमार्फत सर्व दुकानदार, आस्थापना व नागरिकांना पुढील सूचना देण्यात आल्या आहेत, एकल वापराचे प्लास्टिक उत्पादन, वापर, साठवण, वाहतूक व विक्री संपूर्णपणे बंद आहे अशा वस्तूंचा वापर आढळल्यास दंड व गुन्हा नोंद करण्याची कार्यवाही केली जाईल. शहरात प्लास्टिकचा साठा, वाहतूक किंवा विक्री होत असल्याची माहिती मिळाल्यास नागरिकांनी जालना महानगरपालिकेला कळवावे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि महानगरपालिका यामार्फत नियमित तपासणी मोहिमा राबविण्यात येतील.

जालना शहर महानगरपालिकेच्या या मोहिमेमुळे शहरातील प्लास्टिक प्रदूषण नियंत्रणाकडे एक सकारात्मक पाऊल उचलण्यात आले आहे. मनपा प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, शहर स्वच्छ, पर्यावरण निरोगी ठेवण्यासाठी प्लास्टिकमुक्त जालना हेच आगामी ध्येय आहे.

# माजी पालिका आयुक्तांविरोधातील तपासकामी सीसीटीव्ही फुटेज जतन करा

## लाचखोरी प्रकरण: सामाजिक कार्यकर्त्याची पोलीस अधीक्षकांकडे मागणी

**जालना । प्रतिनिधी -** येथील माजी महानगरपालिका आयुक्त संतोष महादेव खांडेकर यांच्या लाचखोरी प्रकरणाच्या तपासात आता एक नवीन मागणी पुढे आली आहे. सामाजिक कार्यकर्ते दिनेश चुन्नीलालजी नंद यांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदन देऊन, या प्रकरणातील महत्त्वाचा पुरावा म्हणून न्यायालयाच्या आवारातील आणि महानगरपालिका कार्यालयातील सीसीटीव्ही फुटेज जतन करण्याची मागणी केली आहे.

जालना महानगरपालिकेचे तत्कालीन आयुक्त संतोष खांडेकर यांना एका कंत्राटदाराकडून १० लाख रुपयांची लाच घेतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) रंगेहाथ पकडले होते. कामाचे बिल मंजूर करण्यासाठी खांडेकर यांनी ही लाच मागितली होती, त्यानंतर एसीबीने त्यांच्या कारवाई केली. त्यात खांडेकर यांना अटक करण्यात आली होती आणि सध्या ते न्यायालयीन कोठडीत आहेत.

सामाजिक कार्यकर्ते दिनेश नंद यांनी पोलीस अधीक्षकांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, १७ ऑक्टोबर २०२५ रोजी जेव्हा संतोष खांडेकर यांना जालना सत्र न्यायालयात हजर करण्यात आले, तेव्हा महानगरपालिकेचे अनेक अधिकारी -कर्मचारी कार्यालयीन वेळेत न्यायालयाच्या आवारात मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पालिका अधिकारी कर्मचाऱ्यांची ही गर्दी एका मोठ्या कटाकडे आणि या प्रकरणात त्यांच्या संभाव्य सहभागाकडे संशय निर्माण करते, असे नंद यांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे.

या संशयाला पुष्टी देण्यासाठी आणि तपासाला योग्य दिशा मिळण्यासाठी, नंद यांनी दोन प्रमुख मागण्या केल्या आहेत त्यात न्यायालयातील सीसीटीव्ही फुटेज:१७ ऑक्टोबर २०२५ रोजीचे जालना सत्र न्यायालयाच्या आवारातील सर्व कॅमेऱ्यांचे संपूर्ण दिवसाचे सीसीटीव्ही फुटेज सुरक्षित आणि जतन करण्यात यावे. महानगरपालिकेतील सीसीटीव्ही फुटेज: त्याच दिवशीचे, म्हणजेच १७ ऑक्टोबर २०२५ रोजीचे, जालना महानगरपालिकेतील सर्व कॅमेऱ्यांचे फुटेज जतन करण्यात यावे. यामुळे संबंधित कर्मचारी त्यांच्या कार्यालयीन कर्तव्यावर हजर नव्हते, हे सिद्ध होण्यास मदत होईल.



नंद यांनी आपल्या निवेदनात भारतीय साक्ष्य अधिनियम, २०२३ चा उल्लेख केला आहे. या नवीन कायद्यानुसार, इलेक्ट्रॉनिक पुरावे, जसे की सीसीटीव्ही फुटेज, न्यायालयात ग्राह्य धरले जातात. त्यामुळे, हे फुटेज या प्रकरणातील एक महत्त्वाचा आणि कायदेशीर पुरावा ठरू शकतो.

फौजदारी प्रक्रिया संहिता आणि नवीन भारतीय नागरिक सुरक्षा संहिता अंतर्गत, पोलिसांना तपासादरम्यान महत्त्वाचे पुरावे जप्त करण्याचा आणि संरक्षित करण्याचा अधिकार आहे. त्यामुळे, नंद यांची मागणी कायदेशीर चौकटीत बसणारी आहे.या प्रकरणात सीसीटीव्ही फुटेज मिळाल्यास, खांडेकरांव्यतिरिक्त आणखी कोणी या भ्रष्टाचाराच्या प्रकरणात सामील आहे का, याचा उलगडा होण्यास मदत होऊ शकते. तसेच, कार्यालयीन वेळेत कामावर हजर न राहता न्यायालयाच्या आवारात गर्दी करणाऱ्या कर्मचाऱ्यांवरही प्रशासकीय कारवाईचा बडगा उगारला जाऊ शकतो.

आता पोलीस अधीक्षक या मागणीवर काय कारवाई करतात आणि या प्रकरणाच्या तपासाला कोणती नवी दिशा मिळते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# विविध विकास कामांचे राहुल लोणीकर यांच्या हस्ते उदघाटन

## माजी मंत्री आ बबनराव लोणीकर यांच्या माध्यमातून मतदार संघामध्ये समतोल विकास कामे केली - भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर

**परतूर । प्रतिनिधी -** तालुक्यातील श्रीष्टी सर्कल मधील गावामध्ये रस्ते विकास तसेच आरोग्य उपकेंद्राचे उद्घाटन करताना मोठे समाधान लाभत असून माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी केलेल्या मतदार संघातील विकास कामामुळे तेथील सर्वसामान्य जनता समाधानी असल्याचे भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांनी सांगितले.

ते सिंगोना येथे आरोग्य उपकेंद्र ५८ लक्ष , अंतर्गत सिमेंट रस्ता १०लक्ष, दलित वस्ती अंतर्गत सिमेंट रस्ता १४ लक्ष दैठणा येथे मुख्य रस्ता ५० लक्ष, गावाअंतर्गत सिमेंट रस्ता २० लक्ष धनगर वस्तीमध्ये सिमेंट रस्ता दहा लाख रुपये, पंचवीस पंधरा निधी अंतर्गत सिमेंट रस्ता दहा लक्ष रुपये,, येनोरा येथे शाळा खोली बांधकाम ४८ लक्ष, बस स्टॅन्ड ते नामदेव महाराज मंदिर रस्ता ०१ कोटी, सिमेंट रस्ता १० लक्ष ग्रामपंचायत पासून विठ्ठल मंदिरापर्यंत सिमेंट रस्ता बांधकाम करणे ३० लक्ष रुपये,, पाटोदा येथे आरोग्य उपकेंद्र ५८ लक्ष रुपये, पशुवैद्यकीय दवाखाना दुरुस्ती १० लक्ष , सौर पथ दिवे बसवणे १०, लक्ष रुपये, ग्रामपंचायत कार्यालय इमारत बांधकाम २० लाख



रुपये , दलित वस्ती अंतर्गत बांधण्यात आलेल्या १० लक्ष रुपये किमतीच्या सभा मंडपाचे लोकार्पण शेलवडा येथे सिमेंट रस्ता बांधकाम १० लक्ष रुपये आदी कामाचे भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी ते बोलत होते.

पुढे बोलताना राहुल लोणीकर म्हणाले की, माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांच्या माध्यमातून, मतदारसंघातील ४२००० घरकुलांचा लाभ लाभधारकांना देण्यात आला, यावर्षी अतिवृष्टीने शेतकरी संकटात सापडला असताना माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पाणी केली मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री यांच्याशी अनेक वेळा पत्र व्यवहार केले त्यामुळे परतूर मंठा नेर शेवली भागासाठी १०७ कोटी रुपयांची मदत शेतकऱ्यांना प्राप्त करण्यात आमदार लोणीकर यशस्वी झाले असून, येत्या काळामध्ये मतदार संघाचा चौफेर विकास लोणीकरांच्या माध्यमातूनच होऊ शकतो असा जनतेला ठाम विश्वास असल्याचे यावेळी बोलताना त्यांनी नमूद केले.

यावेळी भाजपा तालुकाध्यक्ष शत्रुघन कणसे युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष संपत टकले , भाजपा जिल्हा सरचिटणीस रमेश भापकर, पस सदस्य शिवाजी पाईकराव , उपसभापती रवींद्र सोळंके सुरेश सोळंके, नितीन जोगदंड अंकुशराव नवल,वगणेश सोळंके सूर्यभान कदम अभिषेक सोळंके, सुंदर मुळे, पिंटू काका ढवळे, धोंडीराम नवल संभाजी खवल संभाजी शिंदे तुला काय नाव सांगितलं सदाशिव खवल कैलास साळवे विष्णू गायकवाड, शाहूराव मुंडे सतीश खवल मोहन नळगे पांडुरंग नळगे, नारायण नळगे बंडू रेपे, प्रल्हाद कणसे अशोक बेरगुडे, यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

पान १ वरुन

## तुकड्यात रस्त्यांची कामे ...

योजना सन २०२५- २६ ग्रामीण रस्ते विकास व मजबुतीकरण (३०५४) अंतर्गत ग्रामा व इजिमा रस्त्याची कामे मंजूर केले जातात, त्यासाठी शासन निर्णय, ग्रामीण विकास व जलसंपदा विभाग दि. ०३ सप्टेंबर २०१६ नुसार आणि नियोजन विभागाचे प्रत्येक वर्षी जारी होणारे मार्गदर्शक परिपत्रक यामध्ये स्पष्ट नमूद आहे की, रस्त्याच्या व इतर कामांचे प्रस्ताव फक्त प्रशासकीय अधिकाऱ्यामार्फतच सादर करावेत असे स्पष्ट निर्देश आहेत.

शासनः निर्णय ०३ सप्टेंबर २०१६ अन्वये कामे मंजुर करण्याची कार्यपध्दती खालील प्रमाणे आहे. :-ग्रामविकास विभागाचा शासन निर्णय क्र. जिवायो-२०१५/प्र.क्र.१९१/परा-८, दि. ०३/०९/२०१६ नुसार जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत कामे मंजुर करण्याची कार्यपध्दती खालीलप्रमाणे नमूद केलेली आहेः

१. मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेमध्ये एक गाव एक रस्ता या धोरणानुसार कोअर नेटवर्क तयार करण्यात आले आहे, या कोवर नेटवर्क व्यातिरिक्त उर्वरित इजिमा व ग्रामा रस्त्याचे सर्वेक्षण करुन झउख आधारे प्राधानक्रम यादी जिल्हा परिषद चे बांधकाम विभागाने जिल्हा परिषदेचे मुख्य उनले कार्यकारी अधिकारी यांच्या मान्यतेने अंतिम करावी व सदरील यादीमधील कामे मंजुरीसाठीचा प्रस्ताव ३-११ आवक विभा. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हानियोजन समितीकडे सादर करावा, रस्त्याचे

सामान्य प्रशाससर्वेक्षण दर दोन वर्षांनी करण्यात यावे.

) रस्त्याचा प्रस्ताव तयार करताना किमान एक किलोमीटर लांबी घेण्यात यावी, डांबरीकरणाची कामे घ्यावीत.

३) एखादा रस्ता ज्या वर्षी मंजूर होईल त्यानंतर पुढील चार वर्षे त्या रस्त्याच्या लांबीचा समावेश प्रस्तावामध्ये करण्यात येऊ नये, म्हणजेच एकदा त्या रस्त्यावर काम मंजूर झाले की त्या रस्त्यावर पुढील चार वर्ष काम मंजूर होता कामा नये.

४) सदर योजने अंतर्गत होणारी कामे चांगल्या दर्जाची व टिकाऊ व्हावी त्यासाठी सध्या प्रधानमंत्री ग्राम सडक योजने अंतर्गत कार्यान्वित असलेल्या राज्य गुणवत्ता समन्वयक (डटउ) यांच्या अधिपत्या खालील पॅनल वरील राज्य गुणवत्ता नियंत्रण (डट्च्) यांच्याकडून जिल्हा परिषदेच्या अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कामाची तपासणी करुन घ्यावी.

५) जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनीही अचानकपणे दौऱ्याच्या वेळी काही कामाची तपासणी करावी.

६) शासन निर्णय दि.०३ सप्टेंबर २०१६ नुसार, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी उपरोक्त कार्यपध्दत अवलंबण्याची खात्री झाल्यानंतर जिल्हा नियोजन समितीकडे कामे मंजुरीसाठीचा प्रस्ताव सादर करावा असे नमूद आहे म्हणजेच प्रस्ताव विभाग प्रमुखांनी तयार करुन प्रस्तावाची छाननी झाल्यानंतर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे ॠुरीवळपस डर्शीींशी लाऊन प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीकडे सादर करावा म्हणजेच प्रस्ताव तयार करुन जिल्हा नियोजन समितीकडे पाठविण्याचे अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनाच आहे, पालकमंत्री जिल्हा नियोजन समितीचे अध्यक्ष असल्याने धोरणात्मक मार्गदर्शन देणे व फक्त धोरणात्मक निर्णय घेण्याचा त्यांना अधिकार आहे.

परंतु रस्ते मंजुरीसाठी जिल्हा नियोजन समितीकडे प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्याकडून न सादर होता परस्पर पालकमंत्री, जिल्हयातील आमदार, खासदार इत्यादी लोकप्रतिनिधी सादर करतात, जिल्हयाचे पालकमंत्री मा.ना. श्रीमती. पंकजा मुंडे यांनी त्यांचे दि. १८/०९/२०२५ चे पत्र नियोजन समितीला मिळालेले दि. ०६/१०/२०२५ चे पत्रान्वये १०८ कामाद्वारे रु. १५२५ लक्ष (अक्षरी पंधरा कोटी पंचवीस लाख) स्वतःचे स्वाक्षरीत पत्र परस्पर जिल्हा नियोजन समितीकडे कामे मंजुरीसाठी दिले आहे, (पत्राची सत्यप्रत सोबत जोडली आहे) तसेच जिल्हयातील आमादार व इतर लोकप्रतिनिधी यांनीही स्वतःचे पत्रावर आप आपल्या मतदारसंघातील कामाची यादी परस्पर जिल्हा नियोजन समितीकडे सादर केली आहे, हि बाब शासन निर्णय दि. ०३ सप्टेंबर २०१६ चे उल्लघंन आहे.

जिल्हयाचे पालकमंत्री केवळ जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून आलेल्या प्रस्तावाला मंजुरी देऊ शकतात स्वतःचे स्वाक्षरीने पत्राद्वारे कामे प्रस्तावित करणे हि प्रक्रिया शासनाचे निर्णयाचे उल्लंघन आहे, तसेच प्रस्तावित यादीमध्ये रस्त्याची कामे तुकडे तुकडे पडून म्हणजे सर्व कामे रु. १० लाखाचे मर्यादित रक्कमेत सादर केले आहे. हि बाब जास्त गंभीर आहे.

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२५-२६ अंतर्गत ग्रामीण रस्ते विकास व मजबुतीकरण (३०५४) या योजनेअंतर्गत विविध रस्त्यांवर दहा दहा लाख रुपयांच्या लहान लहान कामांचे प्रस्ताव पालकमंत्री महोदयांनी, जिल्हयातील आमदार महोदय व खासदार महोदयांनी जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, जालना यांच्याकडे डायरेक्ट सादर केले आहेत.

सदर पध्दतीमुळे खालील गंभीर अडचणी निर्माण होत आहेत :-

१) एकाच रस्त्यावर दरवर्षी छोटे छोटे काम मंजूर झाल्याने संपूर्ण रस्त्याच्या लांबीचा विचार आणि विकास होत नाही.

२) रस्त्याची गुणवत्त व टिकाऊपणा कमी होतो, कारण काम सातत्यपुर्ण न होता टप्पयाटप्याने केले जाते.

या कामांमधून लहान कंत्राटदारांना विभागलेली कामे मिळतात, ज्यामुळे गुणवत्ता नियंत्रण कठीण होते व कामे निकृष्ट दर्जाचे होतात. (

४) शासनाच्या निधीचा स्थायी व परिणामकारक उपयोग न होता तात्पुरता खर्च होतो.

५) काही रस्त्यांवर दरवर्षी मंजुरी मिळत असूनही, प्रत्यक्ष रस्त्याची आजही दयनीय अवस्था आहे, सदरील रस्ते आजही सार्वजनिक वाहतुकीसाठी योग्य नाहीत. उदा निरखेडा बाजीउम्रद ते निरखेडा रस्त्यावर दरवर्षी निधी मंजूर केला जातो आपण प्रत्यक्ष त्या रस्त्यावर पाहणी केली तर आपल्या लक्षात येईल रस्त्याची स्थिती (उदा साठी फक्त त्या रस्त्याचे नाव दिले आहे.)

६) ३०५४/५०५४ योजने अंतर्गत तुकडे तुकडे करुन रु. १० लक्षाचे मर्यादित कामे मंजुर केल्याने काम करणारा कंत्राटदार व संबंधित अधिकारी यांचे साटेलोटे होऊन ही जोड गोळी कामे न करताच कामाची बिले उचलण्याची शक्यता आहे नोव्हे बोगस बिलाची उचल करतातच, कारण मागील दहा वर्षापासून त्याच त्या रस्त्यावर फक्त खडीकरणाची कामे मंजूर केली जातात. सखोल चौकशी केल्यास या रस्यावर दरवर्षी कामे मंजूर होऊनही रस्त्याची परिस्थिती अत्यंत दयनीय आहे, रस्ते वाहतुकी योग्य नाहीत. रस्ते वाहतुकी योग्य राहत नसल्यामुळे शासनाचा पैसा व्यर्थ जातो. रस्ते मंजुर करणारे व नियम तयार करणारे सर्व अधिकारी हे (सनदी अधिकारी) खड लेव्हलचे आहेत, परंतु प्रत्यक्षात रस्त्याची सद्यस्थिती कशी आहे हे जाणुन घेत नाहीत. ही अत्यंत खेदजनक बाब आहे.

पूरसंरक्षण कामे :- मा. पालकमंत्री, जालना यांनी दिनांक १३ सप्टेंबर २०२५ रोजी पूरसंरक्षक योजनेच्या कामांना प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी कामाच्या नावाची यादी जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समितीकडे परस्पर दिली आहे, परंतु ज्या ठिकाणी काम करण्याची गरज आहे त्या ठिकाणचा सर्व्हे करुन संबंधित विभागाने प्रस्ताव सादर करणे गरजेचे होत तसे न होता पालकमंत्री, जालना यांनी सदरील पत्रे परस्पर जिल्हा नियोजन समितीकडे सादर केले आहे.

सदर पत्रामध्ये मौजे बठाण (खु) येथे दुधना नदीच्या काठी उजव्या बाजूला पूरसंरक्षण भिंतीचे बांधकाम करण्यासाठी दहा दहा लाखाचे छोटे छोटे तुकडे करुन पाच कामे रु. ५० लाखाचे, सिना नदीवर गायत्री देवीचे मंदिर परिसरात उजव्या बाजुने संरक्षण भिंत बांधकाम करण्यासाठी दहा दहा लाखाचे पाच कामे रु. ५० लाखाचे मंजुरीसाठी प्रस्तावित केले आहे. दुधना नदी व सिना नदी या खूप

मोठ्या नद्या आहेत, त्या ठिकाणी प्रत्येकी ५० रु. लाखाचे एक काम प्रस्तावित करायला पाहिजे होते, एकच काम प्रस्तावित केले असते तर सदर कामाची ई निविदा प्रसिध्द होऊन काम मोठ्या कंत्राटदारास मिळून कामाचा चांगला दर्जा राखला गेला असता, परंतु पालकमंत्री, जालना यांनी हेतुपुरस्करपणे कार्यकर्ते पोसण्यासाठी दहा-दहा लाखाचे पाच तुकडे करुन कामे प्रस्तावित केले आहे, हे योग्य नाही.

सदर काम मजूर सोसायटीला मिळेल आणि कामाचा दर्जा राखला जाणार नाही, काम निकृष्ट दर्जाची होतील, सदरील पत्राकडे जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती यांनी हेतुपुरस्कारपणे दुर्लक्ष करुनसदरील पत्र लघुपाटबंधारे विभागाकडे मंजुरीसाठी पाठविले आहे.

तसेच पालकमंत्री, जालना यांनी घनसावंगी तालुक्यात विविध सात गावात प्रति गाव रु. १४९.१० चे सात कामे एकूण रु. १०.५० कोटी चे अंबड तालुक्यातील तीन गावांमध्ये प्रत्येक गावामध्ये १.५० कोटी प्रमाणे रु. ४.५० कोटीचे कामे प्रस्तावित केली आहेत. खर तर पालकमंत्री हे सर्व जिल्हयाचे असतात कोणत्या एका तालुक्याचे नसतात असे असतानाही त्यांनी या हेड खाली घनसावंगी व अंबड तालुक्यात झ गुकते माप देऊन कामे मंजुर करणेसाठी मा. जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समितीकडे शिफारस केली आहे. या पत्रामध्ये भोकरदन तालुका, जाफ्राबाद मंठा, घनसावंगी आणि बदनापूर तालुक्यात एकही गावात पूरसंरक्षण भिंतीचे काम करण्यासाठी शिफारस केली नाही, हे योग्य नाही. शासनाचा पैसा व्यर्थ घालविणे व आपल्या कार्यकर्त्याला मोठे करणे हाच यामध्ये उद्देश आहे असे दिसून येते.

जालना शहरातील विद्यमान आमदार मा. आ. अर्जुनराव खोतकर राहत असलेल्या भाग्यनगर कॉलनीसह शिवशक्ती ग्रीन सिटी, घायाळ नगर यासह जालना शहरातील अनेक वस्त्यांमध्ये दि. १५/०९/२०२५ रोजी अतिवृष्टी झाल्याने शेकडो नागरिकांच्या घरात पाणी शिरले होते. जालना शहरातील जवळपास दोनशे चार चाकी व दोन चाकी वाहने १००% डॅमेज झाले आहे, संसार उपयोगी साहित्याचे अतोनात नुकसान झाले आहे. हा पूरसंरक्षणचा निधी भाग्यनगर पासून शिवशक्ती ग्रीन सिटी पर्यंत येणाऱ्या नाल्याचे रुंदीकरण व नाल्यावर संरक्षण भिंत बांधकामावर केला असता तर शासनाचा पेसा व्यर्थ न जाता नागरिकांचा फायदा झाला असता.

तथापि पुरामुळे बाधित झालेल्या शिवशक्ती ग्रीन सिटी या भागात मा. पालकमंत्री पाहणी करण्यासाठी आल्या असता त्यांच्यासमोर नागरिकांनी भाग्यनगर पासून ते शिवशक्ती ग्रीन सिटी पर्यंत येणाऱ्या नाल्याचे रुंदीकरण व संरक्षणभिंत बांधण्यासाठी जिल्हा वार्षिक योजनेतून निधी उपलब्ध करुन द्यावा अशी विनंती केली होती. मा. पालकमंत्री यांनी या वेळी निधी उपलब्ध करुन नाल्याचे रुंदीकरण करुन संरक्षण भिंतीचे बांधकाम करण्यात येईल असे जाहीरपणे सांगितले होते परंतु असे न होता घनसावंगी व अंबड तालुक्यातील लोकांची मागणी नसताना तसेच संबंधित विभागाचा सर्व्हे करुन कामे मंजुर करण्यासाठीचा प्रस्ताव नसताना काही कार्यकर्ते मोठे करण्यासाठी सदर चा निधी घनसावंगी व अंबड तालुक्यातील अनेक गावातील नाल्यावर संरक्षण भिंतीचे बांधकाम करण्यासाठीचे काम प्रस्तावित केले आहे हे योग्य नाही.

ग्रामपंचायतींना जनसुविधेसाठी विशेष अनुदान योजना :-

जिल्हा वार्षिक योजना २०२५- २६ अंतर्गत ग्रामपंचायतीचा जनसुविधेसाठी विशेष अनुदान योजने अंतर्गत मंजूर केले जातात त्यासाठी शासन निर्णय ग्रामीण विकास व जलसंपदा विभाग दि. ०३ सप्टेंबर २०१६ महाराष्ट्र जिल्हा नियोजन समिती अधिनियम आणि नियोजन विभागाचे वार्षिक मार्गदर्शक परिपत्रक नुसार जिल्हा स्तरावर प्रस्ताव तयार करुन जिल्हा नियोजन समितीकडे प्रस्ताव सादर करणे व कामे मंजूर करणे ही पध्दत आहे, दि. ०३ सप्टेंबर २०१६ चे शासन निर्णयानुसार कामे प्रस्तावित करण्याचे अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना आहेत म्हणजेच प्रस्ताव विभाग प्रमुख तयार करतात, प्रस्तावाची तपासणी करुन सदरील प्रस्ताव मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या ॠुरीवळपस डर्शीींशी ने मा. जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव जिल्हा नियोजन समिती जालना यांचेकडे सादर केल्या जातात प्रस्ताव सादर करण्याचा अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद जालना यांचा आहे, जिल्हयाचे पालकमंत्री हे जिल्हा नियोजन समितीचे अध्यक्ष असल्याने ते धोरणात्मक मार्गदर्शन देणे व धोरणात्मक निर्णय घेऊ शकतात.

परंतु जिल्हयाचे पालकमंत्री मा.ना. पंकजा मुंडे यांनी त्यांचे दि. १८ सप्टेंबर २०२५ जे जिल्हा नियोजन समितीस मिळाले दि.०६ ऑक्टोबर २०२५ चे पत्रान्वये जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२५- २६ मधून ग्रामपंचायतीना जनसुविधेसाठी विशेष अनुदान योजने अंतर्गत १६४ कामामध्ये १६६१.०० लाख (अक्षरी सोळा कोटी एकसप्ट लाख) परस्पर मा. जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव जिल्हा नियोजन समितीला सादर केले आहे, (सोबत पत्राची छायाप्रत जोडली आहे,) ही बाब शासन निर्णय, ग्रामीण विकास व जलसंपदा विभाग दि.०३ सप्टेंबर २०१६ चे उल्लंघन आहे, जिल्हयाचे पालकमंत्री केवळ उझ्झउ बैठकीत अध्यक्ष म्हणून कामाना मंजुरी देऊ शकतात परंतु परस्पर जिल्हाधिकारी तथ सदस्य सचिव जिल्हा नियोजन समितीकडे स्वतःचे पत्राद्वारे कामे प्रस्तावित करणे हि प्रक्रिया शासनाचे निर्णयाचे उल्लंघन आहे.

पालकमंत्री स्वतः स्वतःच्या पत्रावरुन जनसुविधे अंतर्गत कामांची यादी जिल्हा नियोजन समितीकडें सादर करुन ती मंजूर करणे हे शासनाच्या नियमाला धरुन नाही, कामे फक्त मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. यांच्या अधिकृत प्रस्तावावरुन विचारात घेतली जाऊ शकतात.

म्हणून विनंती की, मा. पालकमंत्री यांनी परस्पर दिलेल्या कामाची यादी रद्द करावी.

प्रादेशिक पर्यटन योजने अंतर्गत कामे प्रस्तावित करताना जिल्हाधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातील मा. जिल्हा नियोजन अधिकारी यांनी त्यांचे दि. १०.०९.२०२५ चे पत्रान्वये प्रस्तावित कामाचे तुकडे तुकडे न पाडता एकत्रितरीत्या (क्लब) करुन अंदाजपत्रके सादर करावे असे निर्देश मा. कार्यकारी अभियंता सा.बा. विभाग -१ व २ आणि कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद, जालना यांना दिले आहेत.

तथापि हाच नियम जिल्हा वार्षिक योजना २०२५- २६ अंतर्गत ग्रामीण रस्ते विकास व मजबुतीकरण (३०५४) योजना, पूरसंरक्षण योजना, यात्रा स्थळ विकसित योजना, पर्यटन, दलित वस्ती योजना, जनसुविधा योजना, आरोग्य विभागातील कामे प्रस्तावित करण्यासाठी मा. जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती यांनी हा नियम का नाही लावला हा प्रश्न निर्माण होतो, याबाबत विचार करावा.

वरील बाबींच्या अनुषंगाने विनंती आहे की, ग्रामीण रस्ते विकास व मजबुतीकरण (३०५४ योजना) व इतर सर्व योजना अंतर्गत कामे तुकडे तुकडे करुन मंजूर न करता संपुर्ण लांबीच्या एकसंघ प्रकल्पाच्या स्वरुपात मंजुर करण्यात यावीत, किमान एक एक किलोमीटर चे डांबरीकरणाची कामे होती घ्यावीत. रस्ते विकासाचे प्रस्ताव कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद / प.स. नुसार सर्वेक्षण करुन यांच्या सल्ल्यानुसार सातत्यपूर्ण, गुणवत्तापूर्ण व परिणामकारक पध्दतीने कामे मंजुरीसाठी प्रस्तावित करावी, पालकमंत्री यांनी स्वतःचे स्वाक्षरीने परस्पर जिल्हा नियोजन समितीकडे दिलेले पत्र गृहीत न धरता शासन निर्णय ३ सप्टेंबर २०१६ नुसार कामे मंजूर करणेसाठी प्रस्ताव पाठवावेत आणि निधीचा वापर लोकहित व दीर्घकाळ दृष्टीने परिणामकारक ठरेल अशा प्रकारे पुनर्विचार करण्यात यावा, त्याच बरोबर पालकमंत्र्यांनी परस्पर मंजुर केलेली सर्वच कामे तातडीने रद्द करुन पुन्हा सर्वच कामे योग्य पध्दतीने आणि नियमानुसार करण्याची कार्यवाही तात्काळ करावी नसता सक्षम न्यायालयात प्रकरणी दाद मागावी लागेल. किंवा आंदोलनाचा प्रवित्रा घ्यावा लागेल.

टिप :-सोबत जोडलेली कागदपत्रे

१. सर्व शासन निर्णय

२. प्रस्तावित कामांची यादी

३. जिल्हा नियोजन समिती अधिकारी यांचे पत्र

**अर्जदार अनिरुध्द मारोतीराव शेळके मो.नं. ******९५८४**

नेर व सेवली सर्कल मधील अनेक गावात ०४ कोटी ९४ लक्ष रुपयांच्या विविध विकासकामांचे उदघाटन

# अतिवृष्टीने बाधित शेतकऱ्यांसाठी परतूर-मंठा-नेर-सेवलीसाठी १०७ कोटी रुपये मदत प्राप्त; शेतकऱ्यांच्या खात्यात लवकरच जमा होणार

## माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांची माहिती






**परतूर । प्रतिनिधी -** परतूर विधानसभा मतदार संघात असलेल्या जालना तालुक्यातील नेर आणी सेवली सर्कल मधील विविध गावांमध्ये चार कोटी चौऱ्याऐंशी लक्ष रुपयांची लोकोपयोगी विकास कामे सुरू होत असून या विकास कामांमुळे निश्चितच आरोग्य सुविधा पशुवैद्यकीय दवाखान्याच्या माध्यमातून जनावरांसाठी सुविधा रस्ते विकास आधी जलसामान्यांशी निगडित गरजा भागणार असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी केले ते नेर सेवली सर्कल मधील नेर येथे पशुवैद्यकीय दवाखाना ७२ लक्ष, शाळा खोली दुरुस्तीसह प्राथमिक माध्यमिक व उर्दू शाळेसाठी शौचालय १९ लक्ष रुपये सिमेंट रस्ता बांधकाम १० लक्ष रुपये, पाष्टा येथे आरोग्य उपकेंद्र ५८ लक्ष, पिंपळवाडी येथे आरोग्य उपकेंद्र ५८ लक्ष ग्रामपंचायत कार्यालय २०, लक्ष, पिंपळवाडी ते पिंपळवाडी साठवण तलाव रस्ता खडीकरण ०१ कोटी १२ लाख रुपये, स्थानिक विकास निधी अंतर्गत सिमेंट रस्ता बांधकाम १० लक्ष रुपये, डॉ बाबासाहेब आंबेडकर सभागृह बांधकाम १० लक्ष रुपये पाथरूड येथे आरोग्य उपकेंद्र ५८ लक्ष रुपये सोनदेव येथे ग्रामपंचायत कार्यालय २० लक्ष रुपये , जयपूर येथे आरोग्य उपकेंद्र ५८ लक्ष रुपये अशा चार कोटी ९४ लक्ष रुपये निधीच्या विकास कामाचे उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. पुढे बोलताना आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की, येणाऱ्या जिल्हा परिषद पंचायत समिती नगरपालिकेच्या निवडणुका ह्या आपण केलेल्या विकास कामांच्या जोरावर निश्चितपणाने निवडून येणार असून मतदार संघातील १३ पैकी १३ जिल्हा परिषद निवडून आणण्यासाठी आपण संपूर्ण ताकदीनिशी मैदानात उतरणार असल्याचे यावेळी बोलताना माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी नमूद केले

पुढे बोलताना ते म्हणाले की मतदार संघात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले होते या पार्श्वभूमीवर आपण स्वतः अनेक गावांमध्ये जाऊन शेतकऱ्यांच्या पिकांची पाहणी केली होती शेतकऱ्यांना मदत मिळावी यासाठी मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री यांना वारंवार पत्र व्यवहार केले तहसीलदार उपविभागीय अधिकारी जिल्हाधिकारी यांना या अतिवृष्टीच्या लोकशाहीची जाणीव करून दिली त्यामुळे जालना जिल्ह्यासाठी ४२१ कोटी रुपये अशा प्रकारचा मदत निधी शेतकऱ्यांसाठी प्राप्त झाला असून त्यामध्ये परतूर विधानसभा मतदारसंघातील नेर व शेवली भागासाठी ११ कोटी ०९ लक्ष रुपये, मंठा तालुका ४७ कोटी ४८ लक्ष रुपये , परतूर तालुक्यासाठी ४८ कोटी ८१ लक्ष रुपये असे एकूण एक १०७ कोटी ३८ लक्ष रुपये हा जिल्ह्यात सर्वाधिक लाभ मिळवून दिला असल्याचे यावेळी बोलताना त्यांनी सांगितले.

पुढे बोलताना आमदार लोणीकर म्हणाले केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजना राबवत असताना मतदारसंघातील थेट शेवटच्या व्यक्तीपर्यंत या योजना पोहोचवण्याचे काम आपण केलेले असून परतूर मंठा विधानसभा मतदारसंघांमध्ये २७ हजार निराधारांना संजय गांधी निराधार योजना श्रावणबाळ योजना आधी योजनांच्या माध्यमातून सुरू करण्यात आपण यशस्वी झालो असून ४२ घरकुल परतूर मंठा नेर शिवली भागामध्ये रमाई आवास योजना, पंतप्रधान आवास योजना मोदी आवास योजना यशवंतराव चव्हाण घरकुल योजना अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना वसंतराव नाईक घरकुल योजना शबरी योजना आदी योजनांच्या माध्यमातून अशा प्रकारची घरकुल थेट गोरगरिबांना मिळालेली असल्याचे यावेळी बोलताना त्यांनी नमूद केले

पुढे बोलताना आमदार बबनराव लोणीकर म्हणाले कीलभारतीय जनता पक्ष हा केवळ राजकीय पक्ष नाही, तर तो राष्ट्रनिर्मितीचा एक सशक्त प्रवाह आहे. आपल्या पक्षाची विचारसरणी ही सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास या मंत्रावर आधारित आहे. प्रत्येक समाजघटक, प्रत्येक शेतकरी, प्रत्येक युवक, प्रत्येक माता-भगिनी यांच्या जीवनात परिवर्तन घडविण्याचे काम भारतीय जनता पक्षाच्या सरकारने प्रामाणिकपणे केले आहे. केंद्रातील आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वाखाली देशभरात विकासाची नवी क्रांती घडत आहे. प्रधानमंत्री आवास योजना, उज्ज्वला योजना, आयुष्मान भारत योजना, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना अशा असंख्य उपक्रमांमुळे गरीब, शेतकरी व सामान्य जनतेला खऱ्या अर्थाने आधार मिळाला असल्याचे यावेळी बोलताना त्यांनी सांगितले यावेळी कार्यक्रमाला गणेशराव खवणे माऊली शेजूळ, हनुमंतराव उफाड राजेश मोरे विक्रम उफाड, गजानन उफाड, विकास पालवे, डॉक्टर शरद पालवे नाथराव काकडे जिजाबाई जाधव, नारायणराव काकडे डॉक्टर शरद पालवे, विलास घोडके, दिलीप पवार संतोष राठोड राजू पवार राम राठोड संतोष खेडेकर सचिन घाडगे सोनू कुरेवाड जयंत किनगावकर गजानन किटाळे प्रकाशराव रुद्रे संजय राठोड गणेश मोरे सचिन राठोड विशाल गीते संजय भालेराव नंदू घोडे सतीश सदावर्ते अशोक डोके राजू राठोड गजानन ढाकणे सुदाम झुंबड प्रभाकर गाढवे विनायक सोळंके परमेश्वर सोळंके सौरभ माहुरकर प्रमोद भालेकर स्वरूप सानप प्रभाकर गाढवे, संतोष गाढवे, दिगंबर जायभाय महादेव काळे महादेव काळे आदिनाथ काकडे विवेक काकडे कृष्णा काकडे जनार्दन काकडे डॉक्टर काकडे जगन काकडे रावसाहेब बाहेकर विष्णू बायकर काशिनाथ गुरु काकड उपअभियंता राजहंस मॅडम गटशिक्षन अधिकारी कोल्हे जे इ इंगळे पशुसंवर्धन अधिकारी राठोड यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# किशोर डांगे यास सुवर्ण आणि रौप्य पदकांचा दुहेरी मुकुट



**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्याच्या पोलीस दलातील पोलीस कर्मचारी किशोर ज्ञानेश्वर डांगे यांनी मेक्सिको येथील Latin merican World Police and Fire Games 2025 या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भारतासाठी अभिमानास्पद कामगिरी करत पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत सुवर्ण (Gold) तसेच डेडलिफ्ट (Deadlift) स्पर्धेत रौप्य (Silver) पदक पटकावून महाराष्ट्र पोलीस आणि देशाचे नाव उज्ज्वल केले आहे.

ही स्पर्धा San Luis Potosi, Mexico (U.S.. Region) येथे नुकतीच पार पडली. जगभरातील विविध देशांतील पोलीस, अग्निशामक व सुरक्षा विभागातील निवडक खेळाडूंमध्ये झालेल्या या प्रतिष्ठेच्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत किशोर डांगे यांनी आपल्या दमदार कामगिरीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. किशोर डांगे यांनी Powerlifting Category मध्ये अप्रतिम कामगिरी करत प्रतिस्पर्ध्यांना मागे टाकत सुवर्ण पदकावर आपले नाव कोरले. त्याचबरोबर उ्शरवश्रळषीं प्रकारातही त्यांनी अत्यंत कमी फरकाने दुसऱ्या क्रमांकावर झळकत रौप्य पदक मिळवले. या दुहेरी विजयानंतर डांगे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून महाराष्ट्र पोलीस दलात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

महाराष्ट्र पोलीस दलातील जवान म्हणून कार्यरत असलेल्या किशोर डांगे यांनी आपल्या मेहनतीने आणि चिकाटीने आंतरराष्ट्रीय क्रीडा विश्वात भारताचा झेंडा सन्मानाने फडकाविला. त्यांच्या या कामगिरीमुळे महाराष्ट्र पोलीस दलाचे नाव जागतिक व्यासपीठावर गौरवाने पोहोचले आहे.

किशोर डांगे यांनी आपल्या नियमित पोलिसी कर्तव्यासोबतच व्यायामशाळेत कठोर सराव सुरू ठेवत, शारीरिक क्षमतांमध्ये सातत्य राखले आहे. दररोजचे कष्ट, प्रखर इच्छाशक्ती आणि शिस्त या बळावर त्यांनी जागतिक स्तरावर सुवर्ण झळाळी मिळवली आहे. त्यांची कामगिरी हे ‘कर्तव्य आणि क्रीडा दोन्ही क्षेत्रात उत्कृष्टतेचे उत्तम उदाहरण’ ठरली आहे.

किशोर डांगे यांच्या या यशाबद्दल जिल्हा पोलीस अधीक्षक, जालना, तसेच सहकारी अधिकारी, मित्रमंडळी, आणि कुटुंबीयांनी हार्दिक अभिनंदन व्यक्त केले आहे. संपूर्ण जालना जिल्हा पोलीस दल आणि क्रीडा क्षेत्रातील कार्यकर्त्यांकडून त्यांचे भारतीय सिंह म्हणून गौरव करण्यात येत आहे.

किशोर डांगे यांचे हे यश केवळ व्यक्तिगत नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्र पोलीस दलासाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या कामगिरीमुळे हे सिद्ध झाले आहे की इच्छाशक्ती, निष्ठा आणि सातत्य असेल तर कोणतेही ध्येय अशक्य नाही. त्यांच्या या विजयानंतर राज्यातील तरुण पोलीस कर्मचाऱ्यांना क्रीडाक्षेत्रात अधिक सक्रिय होण्याची प्रेरणा मिळणार आहे. भारताचा तिरंगा पुन्हा एकदा जागतिक मंचावर फडकवणाऱ्या किशोर ज्ञानेश्वर डांगे यांना दैनिक युवा आदर्श परिवाराकडून हार्दिक शुभेच्छा आणि अभिनंदन!

# जालना शहरातील प्रदुषण नियंत्रणात आणण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत - जिल्हाधिकारी आशिमा मित्तल




**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरात वाढत्या प्रदुषणामुळे नागरिकांच्या आरोग्यावर मोठ्या प्रमाणावर दुष्परिणाम होत असून अनेकांना विविध आरोग्य विषयक समस्या निर्माण होत आहे. या प्रदुषणाचा सर्वाधिक परिणाम लहान मुलांच्या आरोग्यावर होत आहे. त्यामुळे जालना शहरातील प्रदुषण नियंत्रणात आणण्यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी बैठकीत सांगितले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आज जालना शहरातील प्रदुषण नियंत्रणात आणण्यासाठी महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी व जालना जिल्हा स्टील असोसिएशनचे प्रतिनिधी यांच्या आयोजित बैठकीत त्या बोलत होत्या. या बैठकीस महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक अधिकारी मनिष होळकर, उप प्रादेशिक अधिकारी दिपक बनसोड, क्षेत्र अधिकारी रवि जाधव, जालना जिल्हा स्टील असोसिएशनचे सर्व प्रतिनिधी व नवोपक्रम आणि उद्योजकता संस्था (ड्खछए), आयआयटी मुंबईतील तंत्रज्ञान प्रवर्धन केंद्राचे इंद्रकांत झा यांची उपस्थिती होती.

श्रीमती मित्तल म्हणाल्या की, जालना शहरातील प्रदूषणाची समस्या अधीक असून, शहरातील प्रदूषण नियंत्रणासाठी तसेच पर्यावरणांचा समतोल राखण्यासाठी शहरातील सर्व नागरिक, स्थानिक उद्योग आणि प्रशासनाने एकत्र येऊन पुढाकार घेतल्यास यावर नक्कीच नियंत्रण आणता येईल. याकरीता सर्वांनी प्रयत्न करण्याचे आवाहन त्यांनी केले.

यावेळी जालना शहरातील स्टील असोसिएशनच्या वतीने प्रदुषण नियंत्रणात आणण्यासाठी औद्योगिक वसाहतीमध्ये राबविण्यात येत असलेल्या उपाययोजना याबाबत माहिती देण्यात आली. तसेच यावेळी नवोपक्रम आणि उद्योजकता संस्था (ड्खछए), आयआयटी मुंबईतील तंत्रज्ञान प्रवर्धन केंद्राचे इंद्रकांत झा यांनी सद्यस्थितीत औद्योगिक वसाहतीमध्ये प्रदुषण कमी करण्यासाठी संशोधनात्मक उपाययोजना राबविण्यात याव्यात असे सूचविले..

# जालना जिल्ह्याची सुधारित खरीप पिकांची पैसेवारी जाहिर

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यातील आठ तालुक्याची खरीप हंगाम २०२४-२०२५ या वर्षाची खरीप पिकांची पैसेवारीमध्ये खरीप गावे व एकुण रब्बी गावांपैकी ज्या गावांमध्ये २/३ पेक्षा जास्त खरीप पेरणी झाली असे एकुण ९७१ गावांपैकी ६६७ खरीप गावे व २९८ रब्बी गावे असे एकुण ९६५ गावांची सुधारित पैसेवारी जाहीर करण्यात आली आहे. परतुर तालूक्यातील राणी वाहेगाव हे गाव पुर्णतः निम्न दुधना प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात गेल्यामुळे त्या गावाची पैसेवारी जाहीर करण्यात आली नाही. तसेच मंठा तालुक्यातील चांदेश्वर व गोपेगाव हे गाव पुर्णतः निम्न दुधना प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रामध्ये गेल्यामुळे तसेच गारंटेकी, सोनुनकरवाडी आणि किर्तापुर तांडा या गावांना महसूल दर्जा प्राप्त नसल्यामुळे मंठा तालुक्यातील या ५ गावांची पैसेवारी जाहीर करण्यात आली नाही. जालना जिल्ह्यातील पैसेवारी जाहीर केलेल्या एकुण ९६५ गावांची पैसेवारी ५० पैशापेक्षा कमी आली असल्याची माहिती जिल्हाधिकारी आाशिमा मित्तल यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे.

# परतूर तालुक्यातील वरफळ व सातोना परिसरात मटका जुगार पुन्हा डोकंवर; पोलीस प्रशासन गप्प का?

## स्थानिक नागरिकांमध्ये नाराजी; जुगारमुक्तीची मागणी तीव्र

**परतूर । प्रतिनिधी -** परतूर तालुक्यातील वरफळ व सातोना गावांमध्ये अवैध मटका जुगार पुन्हा उघडपणे सुरू झाल्याने परिसरातील नागरिकांत तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. स्थानिक हॉटेल्समध्ये आणि गल्लीबोळात छोटे केबिन तयार करून खुलेआम मटका घेतला जात असून, जुगार खेळणाऱ्यांना चिठ्ठ्या लिहून दिल्या जात आहेत. ही परिस्थिती पाहता पोलिस प्रशासनाचे मौन अधिकच संशयास्पद वाटत आहे.

**खुलेआम मटका - पोलिसांना माहिती असूनही कारवाईचा अभाव**

वरफळ गावातील एका हॉटेलमध्ये मटका खेळण्यासाठी वेगळे केबिन तयार करून रोज सकाळपासून संध्याकाळपर्यंत व्यवहार सुरू असतात. खेळाडूंना आकडे लिहिलेल्या चिठ्ठ्या देऊन पैसे घेतले जातात, तर काही ठिकाणी मोबाईलद्वारे सट्ट्याची देवाणघेवाणही होत असल्याची माहिती मिळाली आहे.

दररोज काही ठराविक वेळी मटका सुरू होतो. सगळ्यांच्या नजरेसमोर हा धंदा सुरू असूनही पोलीस दुर्लक्ष करतात. यामुळे नागरिकांमध्ये प्रश्न उपस्थित केला जात आहे की, पोलीसांना माहिती असूनही कारवाई का होत नाही? मटका किंग यांना कोणाचा वरदहस्त आहे का?

**काही काळ नियंत्रण, आता पुन्हा धंदे तेजीत**

परतूर येथे काही महिन्यांपूर्वी पोलीस निरीक्षक सुदाम भागवत यांनी पदभार स्वीकारल्यानंतर अवैध मटका, जुगार आणि सट्टेबाजीवर मोठ्या प्रमाणात मोहीम राबवून अनेक ठिकाणी कारवाई केली होती. त्या काळात परतूर तालुक्यातील मटका व्यवसाय जवळपास बंद झाला होता. मात्र आता परिस्थिती पुन्हा पूर्ववत झाली आहे.

मटका बहाद्दरांनी पुन्हा निर्धास्तपणे धंदा सुरू केला आहे. आता पोलिसांची नजर चुकवून किंवा काही ठिकाणी पैशांच्या देवाणघेवाणीतून हा व्यवसाय फोफावला आहे, असे स्थानिक ग्रामस्थांनी सांगितले.

**फसवणुकीचा सापळा - आर्थिक संकटात सापडलेले नागरिक बळी**

सध्याच्या आर्थिक अडचणींच्या काळात अनेक गोरगरीब नागरिक ‘दहा रुपयांत हजार जिंकण्याचे आमिष’ दाखवून मटक्याच्या जाळ्यात अडकले आहेत.

लोकांच्या लोभाचा फायदा घेत काही जुगारबाज पैसे गोळा करून पळून जातात, तर काही ठिकाणी सतत हरल्याने लोक आर्थिकदृष्ट्या उद्ध्वस्त होत आहेत, असे एका नागरिकाने नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी पोलीस प्रशासनाला आवाहन केले आहे की, मटका नावाचा जुगार पूर्णपणे बंद करून गरीब जनतेला दिलासा द्यावा.


**ग्रामीण भागातही विस्तार -**

**प्रशासन निष्क्रिय**

फक्त वरफळच नव्हे तर सातोना, मुरमा, हिवरा, सावरगाव आदी परिसरातही हा अवैध मटका व्यवसाय जोमात असल्याचे वृत्त आहे. काही ठिकाणी मटका केंद्रांना ‘स्थायी ठिकाणे’ मिळाली असून, या ठिकाणी दिवसभर गर्दी पाहायला मिळते.

पोलीस ठाण्याकडून मात्र कोणतीही अधिकृत कारवाई झाल्याचे वृत्त नाही. यामुळे नागरिकांमध्ये चर्चा सुरू आहे की, पूर्वीसारखी कठोर कारवाई न झाल्यास हा अवैध व्यवसाय पूर्ण तालुक्यात पसरू शकतो.

अवैध धंद्यावर कायम स्वरूपी बंदी हवी स्थानिक नागरिकांनी पुढील मागण्या केल्या आहेतः वरफळ व सातोना परिसरातील सर्व संशयित ठिकाणी तातडीने छापेमारी करावी. मटका खेळणारे, चालवणारे आणि संरक्षण देणारे यांच्यावर गुन्हे नोंदवावेत. अवैध जुगार थांबवण्यासाठी विशेष पथकाची स्थापना करावी. जुगारमुक्तीबाबत सार्वजनिक जनजागृती मोहीम राबवावी. परतूर तालुक्यातील या परिस्थितीने कायदा-सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पोलिसांनी केवळ मोहीम म्हणून नव्हे, तर सातत्यपूर्ण व निष्पक्ष कारवाई करून ‘मटका माफिया’चा सुळसुळाट कायमचा थांबवावा. अवैध जुगाराचे पैसे पुढे गुन्हेगारीकडे वळतात, हे लक्षात घेता प्रशासनाने जनहितासाठी तात्काळ पावले उचलणे गरजेचे आहे.



> गुटखा माफिया सतिश उर्फ लाला यांच्या अवैध गुटखा विक्रीमुळे युवा पिढीचे आरोग्य धोक्यात आले आहेत. प्रतिबंधीत गुटखा सर्रास विकला जातो. आणि पोलीस अधिक्षक मुग गिळून गप्प आहेत. त्यातच आता ग्रामीण भागात मटका नावाचा जुगार मोठ्या प्रमाणात खेळविला जात आहे. आणि यातही युवा पिढी मोठ्या प्रमाणात गुरफटली जात आहे. हा सर्व प्रकार केवळ पोलीसांच्या आर्थिक हितसंबंधांमुळे जपला जात आहे. याकडे पोलीस अधिक्षकांनी आता गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी होती आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.